# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

## निदेश क्र. ३६/२०१८

**विद्यापीठ शिक्षकेत्तर पदांच्या सेवाप्रवेश आणि पदोन्नतीसाठी शैक्षणिक अर्हता, अनुभव साक्षात्कारासाठी गुणवत्ता ठरविण्याकरिता परीक्षा पध्दती आणि निवड समितीची रचना इत्यादीविषयी प्रक्रिया निर्धारित करणारा निदेश, २०१८.**

**ज्याअर्थी,** महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ हा दिनांक १ मार्च, २०१७ पासून लागू झालेला आहे.(महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६/२०१७) ;

**आणि**

**ज्याअर्थी**, वर नमुद असलेला अधिनियम गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोलीसाठी लागू करण्यात आला आहे;

**आणि**

**ज्याअर्थी,** विद्यापीठ शिक्षकेत्तर पदाच्या सेवाप्रवेश आणि पदोन्नतीसाठी शैक्षणिक अर्हता, अनुभव आणि निवड समितीची रचना इ. विषयी प्रक्रिया निर्धारित करणारा निदेश, २०१६ (निदेश क्र. १९८/२०१६) हा दिनांक १० नोव्हेंबर, २०१६ रोजी मा. कुलगुरूंनी महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ मधील कलम १४(८) अंतर्गत निर्गमित केला होता आणि तो दिनांक १०/११/२०१६ पासून लागू करण्यात आला होता ;

**आणि**

**ज्याअर्थी,** निदेश क्र. १९८/२०१६ हा परिनियमामध्ये रूपांतरित करण्यात आला नव्हता ;

**आणि**

**ज्याअर्थी,** महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम १२(८) च्या परंतुकामध्ये करण्यात आलेल्या तरतुदीनुसार निदेश क्र. १९८/२०१६ ची परिणामकारकता दिनांक ०९/०५/२०१७ रोजी आपोआप व्यपगत झाली होती ;

**आणि**

**ज्याअर्थी,** सदर निदेशामध्ये नमुद असलेला विषय परिनियमाद्वारे नियमित होणे आवश्यक होते ;

**आणि**

**ज्याअर्थी,** निदेश क्र. १९८/२०१६ चे रूपांतरण परिनियमामध्ये होऊ शकले नव्हते ;

**आणि**

**ज्याअर्थी,** निदेश क्र. १९८/२०१६ चे रूपांतरण परिनियमात केले जाण्याची प्रक्रिया वेळ खाऊ स्वरूपाची होती ;

**आणि**

**ज्याअर्थी,** निदेश क्र. १९८/२०१६ ची परिणामकारकता दिनांक ०९/०५/२०१७ रोजी समाप्त झाली होती ;

**आणि**

**ज्याअर्थी,** निदेश क्र. १९८/२०१६ चे नुतनीकरण नवीन निदेशामध्ये केले जाणे आवश्यक झाले होते ;

**आणि**

**ज्याअर्थी,** निदेश क्र. १९८/२०१६ हा महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ चे कलम १२(८) च्या परंतुकामधील तरतुदी अंतर्गत व्यपगत झाला होता म्हणून कुलगुरूंनी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम १२(८) मधील तरतुदीअंतर्गत निदेश क्र. ८/२०१७ हा दि. १९/०५/२०१७ रोजी निर्गमित केला होता ;

**आणि**

**ज्याअर्थी,** निदेश क्र. ८/२०१७ हा सहा महिन्याच्या कालावधीमध्ये परिनियमात रूपांतरित होवू शकला नव्हता ;

**आणि**

**ज्याअर्थी,** निदेश क्र. ८/२०१७ हा दि. १८/११/२०१७ रोजी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२ (८) च्या परंतुकामधील तरतुदी अंतर्गत आपोआप व्यपगत झाला होता ;

आणि

**ज्याअर्थी,** निदेश क्र. ८/२०१७ चे रुपांतरण परिनियमात होवू शकले नव्हते;

आणि

**ज्याअर्थी**, विद्यापीठ आस्थापनेवरील मंजुर वर्ग १, वर्ग २, वर्ग ३ आणि वर्ग ४ मध्ये समाविष्ट पदांवर सरळ सेवा भर्ती प्रक्रियेसाठी परीक्षेचे आयोजन, व्याप्ती आणि वर्गवारीनुसार परीक्षेचे स्वरूप ठरवून परीक्षा आयोजित केल्या जाण्याच्या निर्णय व्यवस्थापन परिषदेने दिनांक ७/०५/२०१८ रोजी भरलेल्या सभेमध्ये बाब क्रमांक ४ अंतर्गत घेतला होता ;

आणि

**ज्याअर्थी,** निदेश क्र. ८/२०१७ च्या स्थानावर परिक्षा आयोजनासंबंधी तरतुद करून नवीन निदेश निर्गमित केल्या जाण्याची आवश्यकता असल्यामुळे कुलगुरुंनी दिनांक १५/०५/२०१८ रोजी निदेश क्र. १२/२०१८ हा महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ मधील कलम १२ (८) च्या तरतुदी अंतर्गत निर्गमित केला होता ;

आणि

**ज्याअर्थी,** निदेश क्र. १२/२०१८ हा दिनांक १४/११/२०१८ रोजी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ मधील कलम १२ (८) च्या परतुंकामधील तरतुदी अंतर्गत आपोआप व्यपगत झाला होता ;

आणि

**ज्याअर्थी,** निदेश क्र. १२/२०१८ चे रुंपातरण दिनांक १४/११/२०१८ पर्यत परिनियमात होवू शकले नव्हते ;

आणि

**ज्याअर्थी,** विद्यापीठ आस्थापनेवरील मजुंर वर्ग १, वर्ग २, वर्ग ३ आणि वर्ग ४ मध्ये समाविष्ट पदांवर सरळ सेवा भर्ती प्रक्रियेसाठी परीक्षेचे आयोजन, व्याप्ती आणि वर्गवारीनुसार परीक्षेचे स्वरूप ठरवून परीक्षा आयोजित केल्या जाण्याच्या निर्णय व्यवस्थापन परिषदेने दिनांक ७/०५/२०१८ रोजी भरलेल्या सभेमध्ये बाब क्रमांक ४ अंतर्गत घेतला होता ;

आणि

**ज्याअर्थी,** व्यवस्थापन परिषदेच्या निर्णयाच्या अधिन राहून विद्यापीठ आस्थापनेवरील मजुंर वर्ग १,२,३ आणि ४ मध्ये समाविष्ठ पदावर सरळ सेवा भरती प्रक्रीयेसाठी लेखी चाचणी